दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● गुरुवार दि.२१ ऑगस्ट २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २६५ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Thursday 21 August 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 265 ● Pages 4 ● Rate 4 Rs

प्रतिनिधी नेमणे आहे
लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा .

# ‘मल्टिस्टेट’ घोटाळ्यात शहांची एन्ट्री
# लिक्विडेटरमार्फत मिळणार पैसे, ठेवीदारांना दिलासा

## खा.बजरंग सोनवणे यांनी जिजाऊ, ज्ञानराधा, शुभकल्याण, राजस्थानी पतसंस्थांबाबत मांडला होता संसदेत प्रश्न

### खा.सोनवणे राहिले ठेवीदारांची पाठीशी उभा

**बीड जिल्ह्यासह मराठवाड्यात अनेक मल्टिस्टेटवाल्यांनी सामान्य ठेवीदारांना चुना लावलेला आहे. सदरील प्रकरणात ठेवीदारांनी खा.बजरंग सोनवणे यांची भेट घेवून आमचा प्रश्न संसदेत मांडा, आम्हाला न्याय द्या, असे म्हटले होते. खा.बजरंग सोनवणे यांनी ठेवीदारांचा विचार करून संसदेत प्रश्न उपस्थित केला होता. आज केंद्रीय मंत्री यांनी दिलेल्या उत्तरामुळे ठेवीदारांना मोठा दिलासा मिळाला असून ठेवीदारांनी खा.सोनवणे यांचे आभार मानले आहेत.**

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यासह राज्यातील विविध भागात शाखा असलेल्या ज्ञानराधा, जिजाऊ, शुभ कल्याण, जिजामाता व राजस्थानी मल्टीस्टेट पतसंस्था चालकांनी ठेवीदारांना कोट्यावधींचा चुना लावलेला आहे. ठेवीदारांना त्यांचे पैसे परत मिळावेत, यासाठी खा.बजरंग सोनवणे यांनी संसदेत व संसदे बाहेर सतत पाठपुरावा केलेला आहे. खा.सोनवणे यांनी संसदेच्या अधिवेशनात प्रश्न उपस्थित केला होता. त्यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे व प्रभावी मांजणीमुळे या प्रकरणी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी लक्ष घातले असून आता ठेवीदारांना लिक्विडेटरमार्फत ठेवी परत मिळतील, असे लेखी उत्तरही दिले आहे.बहु-राज्य सहकारी पतसंस्थांनी ठेवीदारांचे पैसे न परतवल्याबाबत लोकसभा प्रश्नोत्तरात केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी महत्त्वाची माहिती दिली. बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी अशा सर्व बहुराज्यिय पतसंस्थांमधील ठेवी परत मिळण्यासाठी संसदेमधे प्रश्न उपस्थित करुन या विषयाकडे सरकारचे लक्ष वेधले होते. सदर संस्थांविरोधात अनेक तक्रारी आल्यानंतर केंद्रीय निबंधकांनी महाराष्ट्र शासनाच्या निबंधकांना चौकशी करण्याचे आदेश दिले होते. चौकशी अहवाल समाधानकारक नसल्याने या संस्थांवर बहु-राज्य सहकारी संस्था अधिनियम २००२ अंतर्गत कलम ८६ नुसार विघटन आदेश देण्यात आले असून कलम ८९ नुसार लिक्विडेटर नेमण्यात आले आहे. नेमण्यात आलेले लिक्विडेटर हे संस्थांची चल/अचल मालमत्ता विक्री करून कलम ९० व नियम २० व २९ नुसार ठेवीदारांना पैसे परत करणार असल्याची माहिती देण्यात आली. सरकारने ठेवीदारांचा विश्वास पुनर्स्थापित करण्यासाठी २०२३ मध्ये बहु-राज्य सहकारी संस्था सुधारणा कायदा लागू केला आहे. यात सहकारी निवडणूक प्राधिकरण, लोकपाल नियुक्ती, पारदर्शक लेखापरीक्षण, नवीन गुंतवणूक मार्गदर्शक तत्वे, संचालक अपात्रता निकष व फसवणुकीवर कठोर कारवाई अशा अनेक तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्यामुळे बीड जिल्ह्यासह इतर भागातील ठेवीदारांना संस्थांच्या मालमत्तेतून कायदेशीररित्या परतफेड मिळणार असून, सरकारने त्यांच्या हितासाठी ठोस उपाययोजना केली असल्याचे केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी उत्तरात म्हटले आहे.



# नाथ्रा येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक उभा करा-गौतम आदमने

## बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर नाथ्रा ग्रामस्थांचे अमरण उपोषण सुरू

**बीड । प्रतिनिधी**

नाथ्रा येथील नियोजित स्मारकाची जागा ग्रामपंचायत नमुना नं ८ अ ला नोंद करून पुतळ्या समोरील जिर्ण अवस्थेत असलेल्या सभागृहाच्या ठीकाणी सुसज्ज बौद्ध विहाराची निर्मिती करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक तयार करावे या मागणीसाठी नात्रा येथील ग्रामस्थांचे गौतम आदमाने यांच्या नेतृत्वाखाली अमरण उपोषण सुरू झाले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांना लेखी निवेदन दिले होते आद्याप पर्यन्त प्रशासनाकडून कसल्या प्रकरची दखल घेतली नसल्यामुळे गेली अनेक वर्ष नाथ्रा गावातील बौद्ध बांधवांच्या मागणी प्रमाणे प्रशासन दखल घेत नसून महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक निर्माण करण्याकरीता ग्रामपंचायत, गटविकास अधिकारी, तहसिलदार, उपविभागीय अधिकारी परळी वै. यांच्या कडून महामानवाची अवहेलना होत आहे म्हणून नाथ्रा बौद्ध बांधव आज दि. २०/०८/२०२५ रोजी पासून मा. जिल्हाधिकारी कार्यालय बीड सामोर आमरण उपोषणा सुरुवात केली आहे.सदर आंदोलनात काही अनुचित प्रकार जिवित हानी झाल्यास प्रशासन जबाबदार राहील.असे आंदोलनकर्त्यांनी म्हटले आहे. नाथ्रा येथील समस्त बौद्ध बांधव त्यामध्ये महिला पुरुष बालक मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले आहेत.




# लाडक्या बहिणीनंतर लाडकी सून अभियान
# शिवसेना करणार पीडित महिलांना मदत

**मुंबई (वृत्तसंस्था):** राज्यातील सुनांवर होणाऱ्या अन्याय आणि अत्याचाराला आळा घालण्यासाठी आता शिवसेना ‘लाडकी सून’ अभियान राबवणार आहे, अशी महत्त्वपूर्ण घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यात केली. ‘लाडकी बहीण’ योजनेच्या प्रचंड यशानंतर, आगामी पालिका निवडणुका डोळ्यासमोर ठेवून शिवसेनेने ही नवी मोहीम हाती घेतली आहे. विशेषतः सासरच्या मंडळींकडून होणाऱ्या शारीरिक आणि मानसिक छळाला बळी पडलेल्या महिलांना तात्काळ मदत पुरवणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. या मोहिमेमुळे महिला मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न होत असल्याची टीका विरोधकांकडून होण्याची शक्यता आहे.गेल्या काही दिवसांपासून राज्यात घरगुती हिंसाचाराच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. पुणे येथे राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) राजेंद्र हगवणे यांची सून वैष्णवी हगवणे हिने सासरच्या छळाला कंटाळून आत्महत्या केल्याच्या घटनेनंतर हे प्रकरण राज्यभर गाजले. या घटनेमुळे हुंड्यासाठी सुनांचा छळ होत असल्याचे पुन्हा एकदा समोर आले. याच पार्श्वभूमीवर शिवसेनेने हे अभियान सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सोशल मीडियावर याविषयी माहिती देताना सांगितले की, आपल्या लेकी-सुना सुरक्षित राहिल्या तरच महाराष्ट्र सुरक्षित राहील. प्रत्येक घरातील सून ही माझी आणि प्रत्येक शिवसैनिकाची लाडकी बहीण आहे. ते पुढे म्हणाले, सुनांचा छळ हा समाजासाठी कलंक असून अशा वृत्तीला ठेचून काढले जाईल. अन्याय करणाऱ्यांना ‘शिवसेना स्टाइल’ने धडा शिकवला जाईल.

या अभियानांतर्गत शिवसेनेच्या सर्व शाखा सुनांसाठी हक्काचे माहेरघर बनणार आहेत. छळ सहन करणाऱ्या महिलांनी थेट शिवसेनेकडे मदतीसाठी यावे, असे आवाहन शिंदे यांनी केले आहे. मदतीसाठी दोन हेल्पलाइन क्रमांकही जाहीर करण्यात आले आहेत: ८८२८८६२२८८ आणि ८८२८८९२२८८. या क्रमांकांवर संपर्क साधल्यानंतर शिवसेनेच्या महिला कार्यकर्त्या (रणरागिणी) मदतीसाठी धावून येतील आणि गरज भासल्यास कायदेशीर मदतही पुरवली जाईल, अशी ग्वाही शिंदे यांनी दिली. दरम्यान, आता योजनेनंतर भाजपही एखादी नवी योजना महिलांसाठी आणू शकते, असे राजकीय जाणकारांना वाटत आहे.

# राज्य सहकारी संघाच्या अध्यक्षपदी प्रवीण दरेकर यांची बिनविरोध निवड

**मुंबई । प्रतिनिधी**

१०६ वर्षांची वैभवशाली परंपरा असलेली सहकार क्षेत्रातील अग्रगण्य अशी संस्था महाराष्ट्र राज्य सहकारी संघाच्या अध्यक्षपदी भाजपा गटनेते आणि मुंबई जिल्हा बँकेचे अध्यक्ष आमदार प्रविण दरेकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. त्याचबरोबर उपाध्यक्षपदी अर्जुनराव बोरुडे, मानद सचिवपदी रामदास मोरे यांचीही बिनविरोध निवड झाली आहे. दरम्यान, चांगल्या संकल्पना घेऊन राज्य सहकारी संघाचा गाडा पुढे नेऊ असे प्रतिपादन आ. दरेकर यांनी निवडीनंतर केले.प्रविण दरेकर पुढे म्हणाले कि, मागील निवडणुकीत झालेल्या गोष्टी सहकारासाठी योग्य नाहीत. सहकारी संघाला उर्जीतावस्था देण्याची गरज आहे या उमेदीने संजीव कुसाळकर यांनी पुढाकार घेतला. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही सांगितले. अशा पद्धतीने आपण निर्विवाद असे बहुमत मिळवले. देवाभाऊ आपल्या पाठीशी असल्याने हे यश आपल्याला मिळाले आहे. आपण सर्वांनी सहकारासाठी काम केले पाहिजे अशी प्रगल्भ भूमिका घेतलीत. त्यातून आज सोन्याचा दिवस दिसतोय. मी ज्या-ज्या ठिकाणी संस्थेत गेलो तेथे त्या पदाची उंची वाढविण्याचे काम केले. संस्थेला अडचणीतून बाहेर काढून ती सशक्त केली हा इतिहास आहे. २५ वर्ष मुंबई जिल्हा बँकेचे सर्वांना एकत्रित घेऊन नेतृत्व करतोय. काही कटुता आल्या असतील मात्र त्याही दुरुस्त करून आज बँक राज्यातील उत्तम बँक म्हणून चालवतोय. बँकेच्या माध्यमातून अनेक योजना मुंबईकरांना दिल्या असल्याचेही दरेकर म्हणाले. ते पुढे म्हणाले कि, आज राज्यातील सहकाराची अत्यंत बिकट अवस्था आहे. अनेक राजकीय नेते सहकारातून मोठे झाले. मात्र विधिमंडळाच्या सभागृहात जे कार्यकर्ते सहकारात एकत्रित मतदान करतात त्यांची कुणी बाजू घेतली नाही परंतु मी सहकाराच्या बाजूने ताकदीने भूमिका मांडण्याचे काम केले आहे. राज्यात जेवढी सहकार क्षेत्र आहेत त्यातील सर्व अडचणी सोडवू. राज्यातील शिखर संस्था म्हणून आपल्याला भूमिका घेणे गरजेचे आहे. सरकारकडून ज्या गोष्टी हव्या असतील त्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विनंती करू. चांगल्या संकल्पना घेऊन संघांचा गाडा पुढे नेऊ, असा विश्वासही दरेकरांनी यावेळी व्यक्त केला. या प्रसंगी सहकारातील ज्येष्ठ नेते शिवाजीराव नलावडे, संजीव कुसाळकर, संचालक नंदकुमार काटकर, प्रकाश दरेकर, नितीन बनकर, रामदास मोरे, अरुण पानसरे, गुलाबराव मगर, विष्णू घुमरे, अनिल गजरे, जयश्री पांचाळ यांसह सहकारातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

# मुंबईपासून मराठवाड्यापर्यंत पावसाचा हाहाकार



**मुंबई (वृत्तसंस्था):** राज्यभरात कालपासून मुसळधार पावसाने झोडपून काढले आहे. मुंबईपासून मराठवाड्यापर्यंत पावसाने हाहाकार माजवला असून, शेती पाण्याखाली गेल्याचे चित्र आहे. पावसाने घातलेल्या थैमानाने बळीराजावर संकट ओढावले आहे. मुंबईत झालेल्या पावसामुळे अनेक भागांतील रस्त्यावर पाणी साचले असून, जनजीवन विस्कळीत झाले आहे. नागरिकांना जीवघेणी कसरत करून मार्ग काढावा लागतोय.

# पालकमंत्री आशीष शेलार यांनी घेतला आपात्कालीन व्यवस्थापनाचा आढावा

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईत सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे नागरिकांना त्रास होऊ नये म्हणून सर्व आपात्कालीन यंत्रणा सज्ज आहेत, अशी माहिती मुंबई उपनगर पालकमंत्री ऍड आशिष शेलार यांनी दिली. मुंबई सुरू असलेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर मुंबईचे पालकमंत्री आशिष शेलार यांनी सोमवारी मुंबई महापालिका मुख्यालयातील आपात्कालीन व्यवस्थापनाचा आढावा घेतला, त्यानंतर ते बोलत होते. संबंधित यंत्रणांना योग्य त्या सूचना दिल्या असून नागरिकांनी घाबरून न जाता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करत काळजी घ्यावी, असेही आवाहन त्यांनी केले आहे.पालकमंत्री श्री शेलार यांनी आज मुंबई महानगरपालिकेच्या आपत्कालीन व्यवस्थापन कक्षाला भेट देऊन आयुक्त भूषण गगराणी, अतिरिक्त आयुक्त तसेच आपत्ती व्यवस्थापन विभाग प्रमुखांसोबत बैठक घेतली. या बैठकीत सीसीटिव्हीच्या माध्यमातून मुंबईतील प्रमुख चौकांची परिस्थिती, शाळा-महाविद्यालयांतील हालचाली, उपनगरीय रेल्वेची स्थिती, तसेच सखल व डोंगराळ भागांतील परिस्थितीचा सविस्तर आढावा घेण्यात आला.उपनगरीय रेल्वे वाहतूक धीमी असली तरी ती बंद झालेली नाही. रेल्वे बंद होऊ नयेत यासाठी स्थानिक स्तरावर आवश्यक त्या व्यवस्था चोख करण्याचे निर्देश पालकमंत्री श्री शेलार यांनी अधिकाऱ्यांना दिले. याशिवाय, सीएसएमटी, दादर, कुर्ला यांसारख्या महत्त्वाच्या स्थानकांवर प्रवाशांची संख्या वाढल्यास प्रवासी वाहतूक सुरळीत करण्यासाठी बेस्टच्या बसेसची तात्काळ व्यवस्था करावी, असेही निर्देश त्यांनी यावेळी दिले.मुंबईतील दुपारच्या सत्रातील शाळा व महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली असून सर्व विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे घरी पोहोचविण्याचे निर्देशही प्रशासकीय यंत्रणांना देण्यात आले आहेत. काही भागांत झाडे व फांद्या पडल्याच्या तक्रारी समोर आल्याने पथकांना तत्काळ कटर्ससह घटनास्थळी जाऊन वाहतूक सुरळीत करण्याचे आदेश दिले गेले आहेत. शिवाय विविध ठिकाणी ताचपुरती पंपिंग स्टेशन्स उभारून साचलेले पाणी समुद्राकडे वळविण्याचीही व्यवस्था करण्यात आली आहे.



संपादकीय

# शोककथेची प्रस्तावना


गेल्या दोन दिवसांत मुंबईच्या जनजीवनाची जी त्रेधातिरपीट उडाली, त्यात खरंतर नवं काही नाही. दरवर्षी हे असंच होत असतं. नवीन आहे, ते पुणे आणि नव्याने वाढलेल्या अन्य शहरांच्या नागरी सुविधांचं झालेलं वस्त्रहरण. 'स्मार्ट सिटी' वगैरे सोडाच; पण पुण्यात पूर्वी जिथे पिण्याच्या पाण्याची मारामार होती, तिथे आता गुडघ्याच्या वर पाणी साचू लागलं आहे. एकेकाळच्या सायकलींच्या, त्यानंतर दुचाकींच्या या शहरातील रस्ते गाड्यांच्या वाहतुकीने तुंबू लागले आहेत. अन्य बाबतीत जाऊ द्या, पण नागरी असुविधा आणि शहर अनास्थेच्या बाबतीत पुण्याने मुंबईशी बरोबरी केली, हे मान्य करावंच लागेल! नाशिक, औरंगाबाद, नागपूर किंवा कोल्हापूरसारख्या अन्य शहरांत या दोन दिवसांत मुंबई – पुण्यासारखा पाऊस झाला नाही म्हणून. अन्यथा, या शहरांचे चेहरेही या दोन महानगरांपेक्षा वेगळे नसते! मराठवाडा आणि कोकणात पावसाने चांगलंच नुकसान केलं आहे. विशेषतः मराठवाड्यातल्या संत्र्या–मोसंबीच्या बागा आणि दोन्ही विभागातल्या शेतातल्या उभ्या पिकांची प्रचंड नासधूस झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलेल्या प्राथमिक अंदाजानुसार राज्यात सुमारे १२ ते १४ लाख हेक्टर जमिनीवर पिकांचं नुकसान झालं आहे. हे नुकसान प्रचंड आहे. श्रावणाच्या अखेरच्या पर्वात झालेल्या बेधुंद पावसाने हाता–तोंडाशी आलेली पिकं; काही ठिकाणी तर शेतजमीनही अक्षरशः वाहून नेली आहे. महानगरं आणि शहरात जनजीवन विस्कळीत झाल्याने होणारं नुकसान आणि ग्रामीण भागात शेतीमातीचं झालेलं नुकसान मोजलं, तर हा आकडा नक्कीच काही हजार कोटींत जाईल. जनजीवन विस्कळीत झाल्याने झालेल्या नुकसानीची भरपाई सरकारला करावी लागत नाही. पण, पिकांच्या नुकसानीची भरपाई सरकारला द्यावी लागते. पीक विमा योजनेतल्या अलीकडच्या बदलांमुळे मुळात शेतकऱ्यांचा या योजनेला असलेला प्रतिसाद अगदी अल्प राहिला आहे. त्यामुळे, या नुकसानीची जबाबदारी सरकारलाच घ्यावी लागेल. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या येत्या निवडणुकीचा विचार करून नुकसानीचे पंचनामे आणि भरपाई करायची झाली, तर तो आकडा मोठा असेल, यात शंका नाही.महाराष्ट्रात नागरिकरण वेगाने होते आहे, हे जगजाहीर आहे. महाराष्ट्रातली स्थलांतरितांची संख्या वाढते आहे. गावातून निमशहरी भागात आणि शहरांत होणाऱ्या स्थलांतराचं प्रमाणही वाढतंच आहे. त्यामुळे, नागरी वस्तीसाठी अधिकाधिक जमीन वापरली जाते आहे. नागरी वस्ती म्हणजे केवळ घरं नव्हेत. घरांबरोबरच रस्ते, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, वीजपुरवठा अशा अनेक सुविधा येतात. बदलत्या जीवनशैलीनुसार या व्यवस्था अद्ययावत असणं गरजेचं आहे. पण, दुर्दैवाने त्या तशा दिसत नाहीत. आधीच्या नसतील, तर त्यात तक्रार करण्यासारखं काही नाही. पण, ज्या नव्याने होत आहेत, त्याही येत्या ५० वर्षांच्या नियोजनाने आखल्या जात आहेत, असं दिसत नाही. त्यांच्या दर्जाचा प्रश्न तर आणखी वेगळा! दोन–तीन दिवसांच्या मुसळधार पावसाने किंवा एखाद्या ढगफुटीने या व्यवस्थांच्या आरेखनात शास्त्रीय बाबी काटेकोरपणे पाळल्या नसल्याचं वारंवार दिसून येतं आहे. पावसाचा कालावधी कधी लांबतो आहे, तर कुठे कमी होतो आहे. पावसाचं प्रमाण तेवढंच असलं, तरी अगदी कमी काळात तीव्र पर्जन्यवृष्टीच्या घटना दरवर्षी घडू लागल्या आहेत. त्यालाच आपण सोप्या भाषेत 'ढगफुटी' म्हणतो. जर हे दरवर्षीच कुठे ना कुठे घडू लागलं असेल, तर त्याबाबत तक्रार तरी किती करणार? आणि किती वेळा आपल्या नगर नियोजनशून्यतेसाठी तेच कारण पुढे करणार? निसर्गाचं चक्र अजून पूर्णपणे माणसाच्या हातात आलेलं नाही. त्यामुळे, निसर्गाचा कल पाहून आपल्याला आपलं जगणं बदलावं लागणार आहे, नियोजनात आवश्यक सुधारणा कराव्या लागणार आहेत. तीव्र पर्जन्यमान हेच यापुढचं 'न्यू नॉर्मल' आहे, हे लक्षात घेऊन त्यादृष्टीने काळजी घ्यावी लागेल. नवे उपाय शोधावे लागतील. गेल्या दहा वर्षांत त्यादृष्टीने काडीचाही बदल झालेला दिसत नाही. राज्याचं नियोजन करणारा विभाग, नगर विकास–ग्रामीण विकास विभाग, नगररचना विभागाला हे आव्हान स्वीकारावं लागेल. त्यासाठी तज्ज्ञांची मदतही घ्यावी लागेल. मुळात लोकप्रतिनिधी आणि सरकारशिवाय काम करणाऱ्या या क्षेत्रातील संस्था आणि तज्ज्ञांना त्यासाठी आग्रह धरावा लागेल. केवळ निविदा आणि 'सुप्रमा' यातच गुंतलेल्या व्यवस्थेला त्याचं भान देऊन जागं करावं लागेल.

वातावरणीय बदलाची चर्चा होते, पण त्यावरच्या स्थानिक उपाययोजनांसाठी फार काही होताना दिसत नाही. 'वातावरणीय बदल' हा विषय काही केवळ चर्चासत्र आणि परिसंवादासाठी नाही. गेल्या दोन दिवसांत कोकण, मुंबई – ठाणे – पुणे, मराठवाडा आणि महाराष्ट्रातील अन्य काही भागांत जनजीवनाची जी दैना झाली, त्याचं कारण वातावरणीय बदलही आहे. 'बदलही' म्हणण्याचं कारण एवढंच, की सारं खापर या एका कारणावर फोडूनही चालणार नाही. शहर नियोजनात घ्यावयाची काळजी आपण विसरून गेलो आहोत. शहरं आपल्याला फक्त सोन्याचं अंडं देणाऱ्या कोंबड्या वाटतात. 'तरंगते चटई क्षेत्र', 'हवेतले काल्पनिक भूभाग' आणि त्याच्या वाढत जाणाऱ्या रकमा शहर नियोजनाच्या मुळावर आल्या आहेत. जमिनीचे अवास्तव भाव आणि त्यामुळे जमीन चोरण्याच्या वापरल्या जाणाऱ्या क्लृप्त्या या दैनेला जबाबदार आहेत. हे केवळ महानगरं आणि शहरातच होतं आहे, असं नाही. गावातल्या ओढ्या–नाल्यांवरची अतिक्रमणं, नदीपात्रात हातपाय पसरणारी बांधकामं, पर्यावरणाच्या दृष्टीने घातक असलेलं बेहिशेबी सिमेंटीकरण या नुकसानीला कारणीभूत आहे. हा प्रश्न केवळ कोणाच्या खिशातून कोणाचे खिसे भरण्याचा नाही. सामान्य असो, की असामान्य; प्रत्येकाच्या जगण्याच्या गळ्याशी हे एक दिवस येणारच आहे. ही केवळ प्रस्तावना आहे. पुढची शोककथा यावरूनच समजून घेण्यातच शहाणपण आहे.

# तापी नदीला पूरस्थिती, नदी काठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

**नंदुरबार । दिपक गोसावी**

धरण क्षेत्रात सुरू असलेल्या पावसामुळे तापी नदीला पूर आलेला असून, नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. जळगाव जिल्ह्यातील हातनूर धरणातून पाण्याचा विसर्ग वाढल्यामुळे नंदुरबार जिल्ह्यातील प्रकाशा आणि सारंगखेडा येथील मध्यम प्रकल्पांमधून मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात येत आहे.१९ ऑगस्ट २०२५ रोजी, जळगाव जिल्ह्यातील हातनूर धरणाचे २४ दरवाजे पूर्ण क्षमतेने उघडून १ लाख ५७ हजार क्युसेक्स पाणी तापी नदीपात्रामध्ये सोडण्यात आले. यामुळे तापी नदीतील पाण्याच्या पातळीत मोठी वाढ झाली आहे.



हातनूर धरणातून येणाऱ्या पाण्यामुळे नंदुरबार जिल्ह्यातील प्रकाशा आणि सारंगखेडा येथील जल व्यवस्थापनावर ताण वाढला आहे. या परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी, प्रकाशा बॅरेज मध्यम प्रकल्पाचे ९ दरवाजे पूर्ण क्षमतेने उघडून १ लाख २५ हजार क्युसेक्स पाणी सोडण्यात आले आहे. त्याचप्रमाणे, सारंगखेडा बॅरेज मध्यम प्रकल्पाचे ७ दरवाजे पूर्ण क्षमतेने उघडून १ लाख १४ हजार क्युसेक्स पाणी नदीपात्रामध्ये सोडण्यात येत आहे.प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, पुढील २४ ते ४८ तासांमध्ये पाण्याचा विसर्ग आणखी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे नदीकाठच्या गावांमध्ये पूरस्थिती निर्माण होऊ शकते. या संभाव्य पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर, कार्यकारी अभियंता (पाटबंधारे, धुळे), उपविभागीय अधिकारी (पाटबंधारे, प्रकाशा), आणि जिल्हा प्रशासनाकडून तापी नदीच्या काठावरील सर्व गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. नागरिकांनी सुरक्षित स्थळी राहावे आणि प्रशासनाकडून येणाऱ्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. पूरस्थितीवर प्रशासनाचे बारीक लक्ष असून, आपत्कालीन परिस्थितीत मदत करण्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्या आहेत.

**हातनूर धरण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर**



**पाऊस होत असल्याने प्रकाशा व सारंखेडा मॅरेज मधून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे असे असले तरी येते २४ ते ४८ तासांमध्ये पाण्याचा विसर्ग वाढण्याची शक्यता आहे त्यामुळे नदीकाठच्या गावातील लोकांनी सतर्क रहावे.**

**–वरूण जाधव**
**सहाय्यक अभियंता प्रकाशा बॅरेज. जिल्हा नंदुरबार**

# प्रमोदजी देशमुख, सगरोळी व पानसरे कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.डॉ.गोपाळ चौधरी यांना बिलोली भूषण पुरस्कार

**बीड । प्रतिनिधी**

बिलोली तालुक्यातील मौजे सगरोळी येथील शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल संपूर्ण देवगिरी प्रांतात प्रसिद्ध असलेल्या संस्कृती संवर्धन मंडळाचे विद्यमान अध्यक्ष प्रमोदजी देशमुख आणि अर्जापूर येथील पानसरे महाविद्यालयाचे मराठीचे प्राध्यापक तसेच पानसरे कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.डॉ. गोपाळराव चौधरी यांना बिलोली भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आलेले आहेत.

प्रमोद देशमुख यांची विविध क्षेत्रात असलेले कार्य शैक्षणिक, सामाजिक व गोरगरिबांच्या तसेच विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवून त्यांना एका वेगळ्या वाटेवर आणून तसेच पाणी संवर्धन, वृक्षवल्ली विविध साहित्य संमेलने, शिबिरे, व्याख्याने अशा विविध क्षेत्रात मोलाचे योगदान असलेले प्रमोद देशमुख यांना तसेच प्रा.डॉ. गोपाळ चौधरी यांनी बिलोली येथे कीर्तन महोत्सव, लावणी महोत्सव, एकांकिका महोत्सव, लोककला महोत्सव, साहित्य संमेलन ,कवी संमेलन , व्याख्यानमाला विविध शिबिरे यातून शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक,राजकीय, सांस्कृतिक क्षेत्रात कार्य करून समाजामध्ये अमुलाग्र बदल घडवून आणण्याचे मोलाचे कार्य केल्याबद्दल तसेच विविध क्षेत्रात सूत्रसंचालनाच्या माध्यमातून व्याख्यानाचे व भाषणाचे द्वारे सतत वावर असणारे तसेच शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात कार्य असणारे पानसरे कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य मराठी विषयाचे उत्कृष्ट प्राध्यापक प्रा. डॉ. गोपाळ चौधरी यांना बिलोली नगरीचे भूमिपुत्र तथा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील सेवानिवृत्त महालेखा वित्त अधिकारी बी.पी. नरोड यांचे मार्गदर्शनाखाली गंगामाता शिक्षण प्रसारक मंडळ बिलोलीच्या वतीने यापूर्वीच अनेक मान्यवरांना बिलोली भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये महाराष्ट्रातील प्रसिद्ध लोककलाकार बिलोलीचे भूमिपुत्र दिलीप खंडेराय,डॉ भीमराव अंकुशकर, अश्विनी हॉस्पिटलचे डॉ. रवींद्र बिलोलीकर अशा



अनेक कला, साहित्य, शैक्षणिक, सामाजिक, वैद्यकीय इत्यादी क्षेत्रातील एकूण तेरा मान्यवरांना बिलोली भूषण पुरस्कार जाहीर झालेले आहेत. या पुरस्काराचे नियोजन व आयोजन काही दिवसात बिलोली येथे महाराष्ट्र महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध व्यक्तीच्या हस्ते संपन्न होणार आहे.सदर आयोजन हे रवींद्र नगर येथील मूकबधिर विद्यालयाच्या मैदानावर संपन्न होणार आहे. असे गंगामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव श्री बी.पी. नरोड यांच्या वतीने सांगण्यात आले आहे. तसे पहिले तर श्री बी.पी. नरोड यांनी बिलोलीत टँकरद्वारे गरजवंतांपर्यंत पाणी वाटप तसेच विविध मोफत वैद्यकीय शिबीर रवींद्र नगर येथे नमस्ते बिलोली किचन सेंटर व उद्योग सेंटरचे उद्घाटन झालेले आहे. ज्याद्वारे बिलोली तालुक्यातील बचत गटाच्या विविध महिलांसाठी व त्यांच्या हाताला काम मिळावे म्हणून सदर लघुउद्योग सुरू करण्यात आलेले आहेत. बिलोली भूषण पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल तेरा मान्यवरांची तसेच शिक्षण महर्षी प्रमोदजी देशमुख प्रा.डॉ.गोपाळ चौधरी, डॉ. रवींद्र बिलोलीकर, डॉ. भीमराव अंकुशकर ,दिलीप खंडेराय इत्यादी विविध क्षेत्रातील मान्यवरांना हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांना शुभेच्छा व त्यांचे अभिनंदन आणि कौतुक सर्व क्षेत्रातून होत आहे.

# छ.शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांचा जागतिक वारसास्थळांच्या यादीत समावेश; शिवसेना खासदारांकडून पंतप्रधानांचे आभार

**उरण । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश केल्याबद्दल मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांच्यासह शिवसेना खासदारांच्या शिष्टमंडळाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन आभार मानले. या ऐतिहासिक किल्ल्यांमध्ये महाराष्ट्रातील ११ आणि तामिळनाडू राज्यातील एका किल्ल्याचा समावेश आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्राच्या ऐतिहासिक महत्त्वाबरोबरच पर्यटन, स्थानिक रोजगार आणि सांस्कृतिक ओळखीला नवी दिशा मिळेल, असा विश्वास खासदार बारणे यांनी व्यक्त केला.





यावेळी केंद्रीय आयुषमंत्री प्रताप जाधव, शिवसेनेचे गटनेते डॉ. श्रीकांत शिंदे, खासदार श्रीरंग बारणे, धैर्यशील माने, रविंद्र वायकर, नरेश म्हस्के, मिलिंद देवरा उपस्थित होते. शिवसेनेच्या खासदारांनी पगडी, छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा देऊन पंतप्रधान मोदी यांचा सन्मान केला. पत्र देऊन आभार मानले. छत्रपती शिवाजी महाराज हे भारताचे महान राजा, रणनीतिकार आणि मराठा साम्राज्याचे संस्थापक होते. छत्रपती शिवाजी महाराजांचे बालपणीचे अनुभव आणि त्यांच्या आईच्या शिक्षणामुळे त्यांना एक कुशल योद्धा आणि कार्यक्षम प्रशासक बनण्यास मदत झाली. १६७४ मध्ये त्यांनी पश्चिम भारतात मराठा साम्राज्याची पायाभरणी केली आणि छत्रपती ही पदवी धारण केली. छत्रपती शिवाजी महाराजांनी वयाच्या १६ व्या वर्षी म्हणजेच १६४५ मध्ये स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली आणि स्वराज्य मोहीम सुरू केली. त्यांची मोहीम केवळ किल्ले जिंकणे किंवा युद्धे लढणे एवढी मर्यादित नव्हती, तर त्याचे उद्दिष्ट स्वतंत्र, न्याय्य आणि स्वावलंबी राज्य म्हणजेच हिंदवी स्वराज्य स्थापन करणे होते.छत्रपती शिवाजी महाराजांनी एक अत्यंत कार्यक्षम आणि न्याय्य शासन व्यवस्था स्थापन केली, जी जनकल्याणावर आधारित होती. त्यांनी शत्रूंना अनेक वेळा पराभूत करणारी लष्करी रणनीती विकसित केली. छत्रपती शिवाजी महाराजांना किल्ल्यांचे महत्त्व समजले आणि त्यांना त्यांच्या रणनीतीचा अविभाज्य भाग बनवले. त्यांनी ३०० हून अधिक किल्ले बांधले आणि त्यांचे नूतनीकरण केले, जे केवळ निवासस्थानासाठीच नव्हे तर लष्करी मुख्यालय, शस्त्रागार आणि खजिना म्हणून देखील वापरले जात होते. त्यांनी प्रत्येक किल्ला प्रशासकीय आणि लष्करी केंद्र म्हणून स्थापित केला. त्यांचे योगदान केवळ किल्ल्यांच्या बांधकामापुरते मर्यादित नव्हते तर त्यांनी त्यांना एक मजबूत सुरक्षा यंत्रणा म्हणून विकसित केले. रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, खांदेरी हे किल्ले केवळ मराठा साम्राज्याच्या गौरवशाली इतिहासाचे प्रतीक नाहीत. तर लष्करी स्थापत्यकलेचे उत्कृष्ट उदाहरण आहेत. याशिवाय, तामिळनाडूतील जिंजी किल्ला देखील या यादीत समाविष्ट आहे.या निर्णयामुळे महाराष्ट्र राज्यातील समृद्ध मराठा वारसा अधोरेखित होईल. ज्यामुळे राज्यातील लोकांचा त्यांच्या इतिहासाबद्दल अभिमान आणि जागरूकता वाढेल. हे किल्ले इतिहासाचे विद्यार्थी आणि संशोधकांसाठी महत्त्वाचे अभ्यासस्थळ बनतील, ज्यामुळे शैक्षणिक पर्यटनालाही चालना मिळेल. या उपक्रमामुळे या किल्ल्यांच्या संवर्धन, जीर्णोद्धार आणि देखभालीला प्रोत्साहन मिळेल, जेणेकरून या किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व दीर्घकाळ टिकून राहील. हे किल्ले जागतिक नकाशावर आल्यामुळे, जगभरातील पर्यटकांना या ऐतिहासिक स्थळांना भेट देण्याची प्रेरणा मिळेल, ज्यामुळे महाराष्ट्र राज्य पर्यटनाचे एक प्रमुख केंद्र बनून देशाच्या अर्थव्यवस्थेत मोठे योगदान देत राहील, असे खासदार बारणे यांनी म्हटले आहे.

# शिक्षणशास्त्र महाविद्यालय मुरबाड येथे माजी विद्यार्थ्यांची नवीन ऊर्जा देणारी सहल उत्साहात संपन्न

**उरण । प्रतिनिधी**

सहल म्हटल की थोरामोठ्यांना आवडणारा विषय. मात्र सन १९९५/९६ या शैक्षणिक वर्षात अध्ययन करणाऱ्या मुरबाड तालुक्यातील शिवळे येथील जनसेवा शिक्षण प्रसारक मंडळाच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनी मुरबाड तालुक्यातील थुबे फार्म वर तीन दिवसांची सहल आयोजित करून पन्नाशीनंतर जगण्याची एक नवीन उमेद व ऊर्जा प्राप्त करण्याचा मार्ग मिळवला.तस पाहिले तर या महाविद्यालयाचे सन १९९५/९६ चे माजी विद्यार्थ गेली पाच वर्षे न चुकता सहल आयोजित करून जीवनात एक नवीन उत्साह निर्माण करत आहेत. या विद्यार्थ्यांनी सुरुवातीला पनवेल तालुक्यातील उसाटणे ,कर्जत, शेगाव, डहाणू व त्या नंतर पावसाळी सहल थुबे फार्म वर आयोजित करून जीवनात एक आनंद मिळविला. या सहलीत नुसता आनंदच मिळविला नाही तर आनंदातून गुरूजनांचा सन्मान करून गुरूजनांच्या ऋणातून काही प्रमाणात उत्तराई होण्याचा छोटासा प्रयत्न केला.सहलीच्या पहिल्या दिवशी थुबे फार्मवर सहभागी झालेल्या सर्व मंडळींनी संध्याकाळी एकत्र जमून मनोरंजनातून आनंद घेण्याच्या प्रयत्न केला. दुसऱ्या दिवशी सर्व मित्रमंडळी सकाळी उठून ज्या महाविद्यालयात बी. एड्. चे शिक्षण घेतले होते त्या शिवळे येथील जनसेवा शिक्षण प्रसारक मंडळाच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयात जाण्याच्या तयारीला लागली.महाविद्यालयाच्या प्रवासाला सुरुवात झाली, मनातील उत्साह आणि गतकाळातील आठवणी घेऊन सर्व मित्रमंडळी महाविद्यालयात पोहचली. महाविद्यालयातील परिसर, तेथील निसर्गरम्य वातावरण पाहून प्रवासाचा क्षीण कधी निघून गेला ते कळले देखील नाही. तीस वर्षांपूर्वी वर्गात पहिल्या आलेल्या ललिता अहिरे हिचे फलकावरील नाव पाहताच सर्वांचा आनंद गगनात मावेनासा झाला. त्यानंतर गुरूजनांच्या सन्मानाची तयारी करण्याची लगबग सुरू झाली. एका एका गुरूजनांचा महाविद्यालयात प्रवेश हा सर्व मित्रमंडळींना आनंद देणारा होता. महाविद्यालयाचे माजी प्राचार्य अंकुश निंबाळकर, प्रा.उमाकांत देशमुख, प्रा.अनिल चुनडे, प्रा.सुभाष घोलप या मंडळींचा सन्मान करतांना मित्रमंडळींचे मन भरून येत होते. शाल,पुष्पगुच्छ, सन्मानपत्र व मिठाई देवून गुरुजनांचा यथोचित सन्मान केला.या वेळी मित्रमंडळींनी केलेले मनोगत तसेच गुरूजनांनी व्यक्त केलेले मनोगत ऐकताना त्यांच्या आयुष्यातील आनंददायी क्षण तसेच खडतर प्रसंग ऐकताना डोळ्यातून अश्रू आवरणे अशक्य होत होते. आपले सर्वच विद्यार्थी योग्य मार्गावर व यशस्वी झाल्याचे पाहून गुरुंनीही आपल्या मनोगतातून आनंद व्यक्त केला. कार्यक्रम संपल्यावर गुरूजनांसोबत थुबे फार्मवर केलेले सहभोजन आनंददायी ठरले. त्या नंतर संध्याकाळी धसई परिसरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या गोरखगड व सिद्धगड परिसरात फिरून इतिहासाच्या गतकाळाला जावून त्या वेळची अनुभूती मिळविली. त्यानंतर रात्रीचे सहभोजन झाल्यावर ललिता अहिरे हिने नियोजन केलेल्या मनोरंजक खेळांचा मनमुराद आनंद घेतला. शेवटी तिसरा दिवस परतीचा उजाडला. सकाळी निसर्गरम्य फार्म वर फेरफटका मारून सकाळचा अल्पोपहार करून स्विमिंग पूल मध्ये मनमुराद आनंद घेतला. त्यानंतर दुपारचे सहभोजन करून आपापल्या घरी परतीच्या प्रवासाला निघताना , सुनील घुले यांच्या ये जिंदगी मिले ना दोबारा या गाण्याने सर्वांचे डोळे पाणावले. वर्षा सहलीचा आनंद मनात साठवत सर्व मित्रमंडळी रात्रीपर्यंत आपापल्या घरी सुखरूप पोहचल्याचे निरोप येवू लागले. संगमनेर येथील आपल्या शेतात सेंद्रिय पद्धतीने शेती करणारे सुनील खतोडे यांनी सर्व मित्रमंडळींना आपल्या शेतातील कांद्याचा वानोळा दिला.

# ‘वाडी’ प्रकल्पांतर्गत १७ बचत गटांना शेळी वाटपाचा लाभ माजी मंत्री डॉ.विजयकुमार गावित यांच्या हस्ते वाटप

**नंदुरबार । दिपक गोसावी**

खासदार हिना गावित यांच्या प्रयत्नातून नंदुरबार तालुक्यातील नटावदसह १० गावांमध्ये ’वाडी’ प्रकल्पांतर्गत विकास कार्यक्रम राबवला जात आहे. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून नटावद येथील १७ बचत गटांना शेळी वाटप करण्यात आले. माजी आदिवासी विकास मंत्री तथा विद्यमान आमदार डॉक्टर विजयकुमार गावित यांच्या हस्ते हा कार्यक्रम पार पडला.

नाबार्डच्या सहयोगाने राबवलेल्या ’सांसद संकुल परियोजना’ अंतर्गत एकात्मिक आदिवासी विकास कार्यक्रम व ’वाडी’ प्रकल्पाच्या माध्यमातून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी माजी खासदार डॉक्टर हिना गावित, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा डॉक्टर सुप्रिया गावित आणि डॉक्टर कुमुदिनी गावित, सरपंच अर्चना गावीत, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाश गावित, युवा मित्र सुनील चव्हाण, उमेदच्या मनीषा पाडवी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात प्रत्येक बचत गटाला एक बोकड आणि चार बकऱ्यांचे वाटप करण्यात आले.




यावेळी बोलताना डॉक्टर हिना गावित यांनी ’वाडी’ प्रकल्पाचा उद्देश स्पष्ट केला. त्या म्हणाल्या, दत्तक घेतलेल्या १० गावांमध्ये शेतीपूरक व्यवसाय, पुरेसे पाणी, रस्ते आणि इतर सुविधा उपलब्ध करून देत, मागास घटकांचा आर्थिक विकास घडवणे हा या प्रकल्पाचा मुख्य दृष्टिकोन आहे. नटावद येथील १२० शेतकऱ्यांपैकी ४० शेतकऱ्यांसाठी सौर ऊर्जेवर आधारित पाणी योजना सुरू करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

माजी मंत्री डॉक्टर विजयकुमार गावित यांनी आपल्या भाषणात शासनाच्या विविध योजनांचा उल्लेख करत त्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवण्याचे काम सुरू असल्याचे सांगितले. वाटप केलेल्या शेळ्यांचा उपयोग दुग्धव्यवसायासाठी तसेच त्यांच्या लेंडी व मूत्राचा औषध व्यवसायात उपयोग करण्याचे आवाहनही त्यांनी शेतकऱ्यांना केले.

जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा डॉक्टर सुप्रिया गावित यांनी जिल्हा परिषदेमार्फत ग्रामविकासासाठी केलेल्या कामांची माहिती दिली. पेव्हर ब्लॉक बसवणे, गावातील रस्ते आणि पाणी व्यवस्था सुधारण्यासाठी निधी उपलब्ध करून दिल्याचे त्यांनी सांगितले.या कार्यक्रमामुळे आदिवासी शेतकरी आणि बचत गटांना आर्थिक विकासाची नवी संधी मिळाल्याचे समाधान व्यक्त करण्यात आले.

# ह.भ.प.संतोष पुरी महाराज याची चोळाखा ते श्री क्षेत्र परमेश्वर मंदिर मुस्तापूर पदयात्रा



**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेडच्या धर्माबाद तालुक्यातील चोळाखा ते श्री क्षेत्र परमेश्वर मंदिर मुस्तापूर अशी २५ किलोमीटरची पदयात्रा ह भ प महंत संतोष पुरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली काढण्यात आली या पदयात्रेत, रोकडेश्वर पाटोदा,चिकना,समराळा,आटाळा, कारेगांव,राहेर,कावळगडा, सह अनेक गावांतील भाविक भक्त सहभागी झाले होते गोदावरी नदीचे पवित्र जल घेऊन परमेश्वराचा जल अभिषेक करण्यात आला ही पदयात्रा प्रचिन परमेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार व परिसर विकास करण्यासाठी व नागरिकांना येथील निसर्ग सौंदर्याने नटलेल्या पर्वत व हिरव्या गर्द निसर्गाच्या कुशीत वसलेल्या परमेश्वराचे दर्शन व्हावे यासाठी ही पदयात्रा काढण्यात आली मंदिराकडे जाण्यासाठी भाविकांना चिखल तुडवत जावे लागते प्रशासन याकडे लक्ष द्यावे व विकास करावा असे महंत संतोष पुरी महाराज यांनी पत्रकारांशी बोलताना म्हणाले.

# वडवणी ते साळींबा दोन महिन्यापूर्वी केलेल्या रस्त्यावर पडले खड्डे

**बीड । प्रतिनिधी**

वडवणी अहिल्याबाई होळकर चौक ते साळींबा या सहा किलोमीटरचे रस्त्याचे काम गेले एक ते दोन महिन्यांपूर्वी संबंधित एजन्सी गुत्तेदारांनी केलेले असून सदरील रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत तसेच काही ठिकाणी रस्ता खचला आहे त्यामुळे या रस्त्याची लवकरच दुरावस्था होण्याची शक्यता आहे तरी सार्वजनिक बांधकाम विभाग, संबंधित गुत्तेदार एजन्सीने रस्ता दुरुस्ती करावी अशी मागणी जनतेतून होत आहे .

वडवणी ते कवडगाव हा अर्ध्या तालुक्याला जोडणारा प्रमुख राज्यमार्ग असून यामध्ये या रोडवर मामला, साळींबा, पिंपरखेड,मोरेवाडी, कवडगाव यासह असंख्य गावचा दळणवळणाचा प्रमुख रस्ता आहे तरी यामध्ये रस्त्याच्या मागणीसाठी ग्रामस्थ जनतेला मोठ्या प्रमाणात संघर्ष करावा लागतो यामध्ये लोकप्रतिनिधी दखल घेतल्यानंतर संबंधित रस्त्यासाठी करोडो रुपयांचा निधी उपलब्ध करून व पण टेंडरद्वारे संबंधित एजन्सी गुत्तेदाराला



काम करण्याची मंजुरी दिली जाते तरी यामध्ये वडवणी येथील अहिल्याबाई होळकर चौक ते साळिंबा या सहा किलोमीटर रस्त्याचे काम गेल्या एक-दोन महिन्यापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत संबंधित एजन्सीने केलेले असून यासाठी करोडो रुपये निधी खर्च करण्यात आलेला आहे संबंधित रोडच्या हॉट मिक्स काम केल्यानंतर याची काहि वर्ष दुरुस्ती करण्याची जबाबदारी ही संबंधित एजन्सी गुत्तेदाराकडे असते तरी यामध्ये कामाच्या दोन महिन्यातच ऐण पावसाळ्यामध्ये साळिंबा या रोडची दुरावस्था झालेली असून यामध्ये साळिंबा फाटा तसेच साळिंबा पुलाच्या अलीकडे यासह इतर ठिकठिकाणी डांबर उखडून मोठ मोठाले खड्डे पडलेले आहेत तसेच अनेक ठिकाणी डांबरासहित रस्ता खचलेला आहे तरी यामुळे इतक्या लवकर केलेले कामाची दुरावस्था झाल्याचे पहावयास मिळत असून त्यामुळे सदरील काम हे नियमानुसार झाले आहे का यामध्ये डांबर व इतर साहित्याचा वापर नियमाप्रमाणे करण्यात आलेला आहे का असे प्रश्न या निमित्ताने निर्माण होत आहे तरी याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ लक्ष देऊन सदरील रोडची दुरुस्ती न केल्यास रोडची दुरावस्था होण्याची शक्यता नाकारता येत नाही तरी या भागाचे आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी त्याकडे लक्ष देऊन संबंधित सार्वजनिक बांधकाम व गुत्तेदारांना समज देऊन रोड दुरुस्ती करण्याचे आदेश देण्याची मागणी जनतेतुन होत आहे.तसेच ग्रामस्थांकडून जनता व्यक्त केला जात आहे तरी सार्वजनिक बांधकाम विभागाने याविषयी तात्काळ लक्ष देऊन दुरुस्ती न केल्यास आंदोलन करण्याचा इशारा साळिंबा यासह ग्रामस्थांनी दिला आहे.

# दिव्यात शिवसेना उपशहरप्रमुखांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबीर संपन्न

## आमदार राजेश मोरे यांनी देखील केले रक्तदान

**ठाणे । प्रतिनिधी**

शिवसेना दिवा उपशहर प्रमुख व मा. नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शनिवार १७ ऑगस्ट रोजी दिवा येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. दिवा विकास प्रतिष्ठानच्या माध्यमातून समाजसेवक कैलेश पाटील यांच्या आयोजनाने दरवर्षी शैलेश पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त अनेक सामाजिक उपक्रम राबवले जातात. येत्या २० ऑगस्ट रोजी कार्यसम्राट नगरसेवक शैलेश पाटील यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.

रक्तदान हेच श्रेष्ठदान असून या सामाजिक भावनेतून शैलेश पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे आयोजन समाजसेवक कैलास मनोहर पाटील यांच्या वतीने करण्यात




आले होते. सदर रक्तदान शिबिर दिव्यातील रिलायन्स टॉवर, शिवसेना शाखा दिवा येथे आयोजित करण्यात आले होते. सदर शिबिराला कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांची विशेष उपस्थिती लाभली प्रसंगी आयोजित शिबिरामध्ये आमदार मोरे यांनी सामाजिक बांधिलकी जपत स्वतः ही रक्तदान केले व रक्तदान हेच सर्व श्रेष्ठदान असून दिवा शहरातील नागरिकांनी रक्तदान करण्याचे देखील आवाहन केले.सदर शिबिरासाठी ब्लड लाईन आणि चॅरिटेबल ब्लड बँक, ठाणे यांचे विशेष सहकार्य लाभले तर हरदेव हॉस्पिटलचे संचालक शेखर देशमुख हे देखील उपस्थित होते. सदर शिबिरात १५७ जणांनी रक्तदान केले तर सर्व रक्तदात्यांचा मा. नगरसेवक शैलेश पाटील यांच्यासह उपस्थित मान्यवारांनी सत्कार व अभिनंदन केले. प्रसंगी मा. उपमहापौर रमाकांत मढवी, आदेश भगत यांच्यासह दिवा शिवसेनेचे विभाग प्रमुख, शाखाप्रमुख, विभाग अध्यक्ष - उपाध्यक्ष उपस्थित होते. तसेच स्थानिक शाखेचे प्रदीप पाटील, भरत मोहिते, किरण जाधव, सुरेश जगताप, जगदीश कदम, माऊली मोहिते, संतोष तांबे यांसह अनेक कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# नशा मुक्तीसाठी कळंबोली वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र कोते यांची धडपड;मोटारसायकल रॅलीचे आयोजन

**पनवेल । प्रतिनिधी**

आजची तरुणाई नशेकडे मोठ्या प्रमाणात आकर्षित होत आहे. याचे गांभीर्य ओळखून कळंबोली वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते पाटील यांच्या नेतृत्वाखाली दिनांक १६/०८/२५ रोजी ११.१५ वा. कळंबोली पोलीस ठाणे हद्दीत नशा मुक्त अभियाना अंतर्गत कळंबोली पोलीस ठाणे तर्फे कळंबोली पोलीस ठाणे - अग्निशमन दल चौक- करवली चौकी -केल २ नाका -सेंट जोसेफ हायस्कूल सेक्टर ५ - हनुमान मंदिर से २- जाधव वाडी- सुधागड स्कूल से १- कळंबोली पोलीस स्टेशन अशी मोटरसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये१) फक्त एक चूक आणि आयुष्यभर पश्चाताप
२) SAY NO तो DRUGS
३)'' नशा नाही, दिशा हवी ''
४) अंमली पदार्थ पासून दूर राहा आयुष्य सुंदर करा
५) ड्रग्स पासून दूर राहा असे विविध संदेश जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी हातात फलक धरून, वाहनावर नशा मुक्त अभियानाचे बॅनर्स लावून जनजागृती करण्यात आली. या मोटरसायकल




रॅलीमध्ये ८ अधिकारी ३५ अमलदार सामील होते.

नशा मुक्त अभियाना अंतर्गत कळंबोली पोलीस ठाणे हद्दीत माऊली फाउंडेशन च्या वतीने आयोजित दहीहंडी मध्ये श्रीमती अमृता खानविलकर, सिने अभिनेत्री यांच्या मदतीने तसेच डिजिटल स्क्रिनवर नशा मुक्त अभियानाचे विविध संदेश दाखवून नशा मुक्त अभियानाची माहिती देण्यात आली व व्यसनापासून दूर राहणे बाबतचा संदेश देण्यात आला.

# एमआयडीसीकडून जमीन घेऊन काम न करणाऱ्यांना नोटीस देऊन जमीन ताब्यात घेणार-अजित पवार

**जळगाव (वृत्तसंस्था)**-जळगाव येथे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचा समृद्ध खान्देश संकल्प आणि पक्ष प्रवेश मेळावा पार पडला. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एमआयडीसीकडून जमीन घेऊन काम करणार नाही त्याला नोटीस देऊन जमीन ताब्यात घेणार असल्याचे विधान केले आहे. या कार्यक्रमात आदिवासी नेत्या प्रतिभा शिंदे यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला.अजित पवार म्हणाले, १८ पगड जातींना बरोबर घेऊन छत्रपती शिवाजी महाराजांनी काम केले. त्यानुसार २६ वर्षांपूर्वीपासून राष्ट्रवादी काँग्रेसचे आतापर्यंत काम सुरू आहे. जाती-धर्माला सोबत घेऊन आम्ही काम करत आहोत. आदिवासींच्या न्याय हक्कासाठी प्रतिभा शिंदे या २५ वर्षांपासून संघर्ष करत आहेत. पण सत्ता आल्यानंतर आपण लोकांचे प्रश्न सोडवू शकतो. कारण निर्णय आणि धोरण घेण्याची क्षमता असते. आम्ही कधी भेदभाव करत नाही, समविचाराने काम करतो.पुढे बोलताना अजित पवार म्हणाले, आम्ही पायाभूत सुविधा देण्याची काम करतो आहे. आम्ही अनेक चढउतार बघितले आहेत. अर्थखाते आपल्याकडे आहे. त्यामुळे कुठल्याही समाजावर अन्याय होणार नाही. इतक्या वर्षात एमआयडीसीकडून जमीन घेतली आणि काम करणार नाही त्यांना नोटीस देऊन त्यांच्या जमिनी ताब्यात घेणार आहोत, असा इशारा अजित पवारांनी दिला. तसेच जो तीन महिन्यांत उद्योग सुरू करेल त्याला आम्ही जमिनी देणार आहोत. उद्योगासाठी कमी दरात वीज देण्याचा प्रयत्न आम्ही करणार आहोत, असे देखील त्यांनी यावेळी म्हटले.आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत. आता इथे सरपंचांनी प्रवेश केला आहे. आम्ही त्यांचे



प्रश्न सोडवू. जे विषय तुम्ही सांगितले आहे ते प्रश्न समजावून घेऊ. हिरामण खोसकर यांच्याकडे राज्याच्या आदिवासी सेलची जबाबदारी दिली आहे. आम्ही सर्वांना बरोबर घेऊन जात आहोत. माणूसकी हीच आमची जात आहे. आमच्याकडे भेदभाव नाही. शाहू-फुले-आंबेडकर यांच्या विचारांनी आम्ही काम करतो. आपली विचारधारा एक आहे, असे अजित पवार म्हणाले.आपली संघटित ताकद आपल्याला न्याय देऊ शकते. अल्पसंख्याक खाते माणिकराव कोकाटे यांच्याकडे आहे. अल्पसंख्याक सुद्धा भारतीय आहेत ही भावना जागरूक करायची आहे. काही गैरसमज आम्ही दूर करू. ज्यांना शंका असतील त्या दूर कराव्या लागतील. पण, आपण ही कायदा हातात घेऊ नका. अल्पसंख्याक समजाला आम्ही न्याय देऊ, असे अजित पवार यांनी म्हटले. प्रतिभा शिंदे यांच्या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही. हा जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसमय करून दाखवू. यानंतर धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यातही सभा घेऊ. त्यावेळी कृषी मंत्री दत्ता भरणे यांना देखील बोलावले जाईल.अजित पवार म्हणाले, जळगाव, धुळे, नंदुरबार, गुजरातच्या काही भागात राष्ट्रवादी काँग्रेसचे काम वाढणार आहे. मी तुम्हाला विश्वास देतो की, तुम्ही निर्णय घेतला याबाबत कधी पश्चाताप होऊ देणार नाही. कलेक्टर, पालकमंत्री, इतर मंत्री सर्वांना घेऊन आम्ही बैठक घेतली. गोरगरीबांना घरं मिळतात का? वन जमीन, गायरान जागेचा लाभ मिळतो का? याबाबत माहिती घेतली. पुणे जिल्ह्यातील हिंजवडीला मोठ्या प्रमाणात आयटी इंडस्ट्री आली आहे. जळगावमध्ये मोठी विमाने उतरतील याची व्यवस्था आम्ही करणार आहोत. त्यामुळे उद्योगपतींना आपल्याकडे येण्याची संधी मिळेल.

# डिजिटल मीडिया परिषदेच्या राज्यव्यापी अधिवेशनासाठी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे-अनिल वाघमारे

**मुंबई । प्रतिनिधी**

१४ सप्टेंबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेशी संलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेचे पहिले राज्यव्यापी अधिवेशन मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख सर यांच्या अध्यक्षतेखाली होत असुन या राज्यव्यापी अधिवेशनासाठी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी केले आहे.

याबाबत अधिक वृत्त असे की, मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख सर यांच्या आदेशानुसार राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यात डिजिटल मिडिया परिषदेचे जाळे निर्माण करण्याचं काम आम्ही घेतलं आहे. राज्यातील जवळपास ३० जिल्ह्यात जिल्हास्तरीय कार्यकारिणीच्या निवडी जाहीर केल्या गेल्या आहेत. उर्वरित जिल्ह्यांत सुध्दा डिजिटल मिडिया परिषदेच्या जिल्हा पदाधिकारी निवडी संदर्भात यंत्रणा उभी केली गेली आहे. महत्वाचे म्हणजे या राज्यव्यापी अधिवेशनात परिषदेशी जोडल्या गेलेल्या या पत्रकारांना एकत्र करून डिजिटल माध्यमांची तांत्रिक माहिती देणे, तसेच परस्पर सुसंवाद, येणाऱ्या अडचणी यांची चर्चा करणे हा या अधिवेशनाचा उद्देश असल्याच्या सुचना परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख सर यांनी दिल्या आहेत.१४ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता एकनाथ रंगमंदिर क्रांती चौक येथे मान्यवरांच्या हस्ते अधिवेशनाचे उद्घाटन होणार असून डिजिटल मिडिया विश्वातील मान्यवरांची व्याख्यानं देखील आयोजित केली आहेत. तसेच उत्कृष्ट युट्यूब आणि पोर्टल चालविणाऱ्या दहा संपादकांचा अधिवेशनात सन्मान करण्यात येणार



आहे. सबस्क्राईबर्स, व्ह्यूवर्सची संख्या, तांत्रिक बाजू, बातम्यांची निवड आणि लोकांचे प्रश्न उत्तम पध्दतीनं मांडणा-या संपादकांची निवड करून त्यांचा गौरव केला जाईल.

डिजिटल मिडिया परिषदेची अद्याप राज्य कार्यकारिणी झालेली नाही.अधिवेशनात राज्य कार्यकारिणी सुध्दा निवडली जाणार असल्याचे मा.श्री.एस.एम.देशमुख सर यांनी आदेशीत केले आहे. डिजिटल मिडियाला सरकारने जाहिराती देण्याचा निर्णय घेतला असला तरी या जीआर मध्ये युट्यूब चँनल्स तसेच न्यूज पोर्टलचा उल्लेख केला गेला नाही. ही बाब मुख्यमंत्र्यांच्या नजरेस आणून देत त्यांना जाहिराती मिळाव्यात असा प्रयत्न केला जाणार असल्याचे तसेच डिजिटल पत्रकारांना अधिस्वीकृती मिळावी यासाठी देखील सरकारकडे पाठपुरावा केला जाणार असून अधिवेशनात तसे ठराव मांडले जाणार आहेत.

प्रिन्ट आणि इलेक्ट्रॉनिक मिडियाचे अनेक प्रश्न अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेने मार्गी लावले आहेत.त्याच प्रमाणे डिजिटल मिडियाला भेडसावणारे प्रश्न हाती घेऊन डिजिटल मिडिया परिषद त्यांचा पाठपुरावा करणार आहे. त्यामुळे अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या संलग्न असलेल्या महाराष्ट्र राज्यातील डिजिटल मिडिया परिषदेच्या राज्य पदाधिकारी तसेच जिल्हाध्यक्ष व तालुका अध्यक्ष यांनी सुध्दा आपल्या जिल्ह्यातील व तालुक्यातील सर्वांसोबत संपर्क साधावा व सर्वांना सोबत घेऊन

जिल्हास्तरीय कार्यकारिणी, तालुका स्तरावर असलेल्या कार्यकारिणी मधील पदाधिकारी व सदस्यांनी या महत्वपूर्ण असलेल्या राज्यव्यापी अधिवेशनात सहभागी व्हावे असे आवाहन देखील डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी केले आहे.

## हजयात्रा नोंदणी पहिला हप्ता भरण्यासाठी मुदतवाढ द्या: खा.बजरंग सोनवणे



**बीड । प्रतिनिधी**

पवित्र हज यात्रा-२०२६ नोंदणी संदर्भातील पहिला हप्ता भरण्याची अंतिम तारीख दि.३०ऑगस्ट पर्यंत वाढवावी, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय अल्पसंख्यक मामले विभागाचे मंत्री किरेन रिजिजू यांची भेट घेऊन केली.

पत्रात म्हटले आहे, पवित्र हज यात्रेला महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात मुस्लिम बांधव जात असतात. नोंदणीसंदर्भातील पहिला हप्ता भरण्यासाठी दि.२० ऑगस्टपर्यंतच मुदत देण्यात आलेली आहे. परंतु लॉटरी जाहीर झाल्यानंतर १५ ते १७ ऑगस्टपर्यंत बँकांच्या सलग सुट्ट्या आणि बँकांमधील तांत्रिक अडचणींमुळे हज साठी इच्छुक अनेक यात्रेकरुंना वेळेत रक्कम जमा करता आली नाही. हज यात्रेसाठी जाणाऱ्या नागरिकांची अडचण लक्षात घेणे आवश्यक असून त्यांना हजला जायचे असताना नोंदणी प्रक्रियेत अडचणी निर्माण होवू नयेत, यासाठी दि.३० ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देणे आवश्यक आहे. या विषयाकडे गांभिर्याने पाहून मुदतवाढ द्यावी, अशी मागणीही खा.बजरंग सोनवणे यांनी केली आहे. यावेळी केंद्रीय अल्पसंख्यक मामले विभागाचे मंत्री किरेन रिजिजू यांनी खा.बजरंग सोनवणे यांना या विषयावर वैयक्तिक लक्ष घालून आवश्यक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आहे. खा.बजरंग सोनवणे सातत्याने सामाजिक विषय मांडत असल्याने त्यांच्या पाठपुराव्याचे आणि विषय मांडणीचे कौतूक होत आहे.

### दुधाला भाव द्या म्हणत खा.सोनवणे झाले आक्रमक

## संसदेसमोर आंदोलन, दूध अनुदान पुन्हा सुरू करण्याचीही मागणी

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातील दूध उत्पादक शेतकरी त्यांच्या विविध मागण्या मान्य करण्यासाठी वेगवेगळ्या स्तरावर सतत आंदोलन करीत आहेत, परंतु त्यांच्या मागण्यांकडे गांभिर्याने पाहिले जात नाही. यामुळे खा.बजरंग सोनवणे यांनी अनेक खासदारांना एकत्रित करत दि.१९ रोजी संसदेसमोरच आंदोलन केले.

राज्यात शेतकरी आणि दुध उत्पादक अडचणीत आहेत. दुधाला मिळणारा भाव आणि जनावरांवर होणारा खर्च याचा ताळमेळ बसायला तयार नाही. यामुळे दुध उत्पादकांना दुधाचा दर वाढून मिळावा, यासाठी बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी सहकारी खासदारांना एकत्रित करून दिल्ली येथे संसदभवन समोर आंदोलन केले. यावेळी गायी व म्हशीच्या दुधाला दर वाढऊन द्यावा, बंद केलेले दूध अनुदान पुन्हा सुरु करावा, दीर्घकालीन 'दूध धोरण' रचना करावी, अशी मागणी करण्यात आली. राज्यात विविध भागात दुध उत्पादकांचे आंदोलन सुरू आहे. त्यांच्या आंदोलनात सर्वसामान्य शेतकरी देखील सहभागी होत असून दि.१९ रोजी दुध उत्पादकांच्या आंदोलनाच्या समर्थनामधे संसदेच्या दारावर प्रतिकात्मक आंदोलन




करण्यात आले. यावेळी दूध उत्पादक शेतकऱ्यासमोरील आव्हाने कमी करणे व दुधाला दर मिळऊन देण्यासाठी प्रयत्नशील राहू, असे खा.बरजंग सोनवणे यांनी म्हटले. यावेळी खा.छत्रपती शाहू महाराज, खा.निलेश लंके आणि इतर खासदारांची उपस्थिती होती. खा.बजरंग सोनवणे हे शेती आणि शेतकऱ्यांच्या जोडव्यवसायावर लक्ष ठेवून आहेत. दुध उत्पादक अडचणीत सापडले म्हणून त्यांनी आंदोलनाचा निर्णय घेतला होता.. दूध हे शेतकऱ्यांसाठी केवळ उत्पादन नसून जोडधंदा आणि जीवन जगण्याचा अविभाज्य घटक आहे. मात्र, आज दुधाला योग्य भाव मिळत नाही, उत्पादन खर्चापेक्षा कमी दराने विक्री करावी लागत आहे. दुसरीकडे दुधात भेसळ करणारे लोक सर्वसामान्य जनतेच्या आरोग्याशी खेळ करत आहेत. या शेतकरी आणि ग्राहकांशी निगडित प्रश्नांवर इंडिया आघाडीच्या खासदारांनी मंगळवारी (दि.१९) संसद भवनासमोर आंदोलन करत सरकारचे लक्ष वेधले.

## साखरपुढ्याला आले अन मंगल परिणय लावुन गेले माजलगाव शहरातील घटना

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव शहरातील जयभीमनगर येथे जाधव व कांबळे परिवाराने एक आदर्श मंगल परीणय करताना लग्नाचा खर्चाला फाटा देऊन साखर पुड्यात लग्न लावुन समाजापुढे एक आदर्श निर्माण केला आहे. या बाबत अधिक माहिती अशी की, माजलगाव येथील झुंबरराव जाधव माजी वाहातुक नियंत्रक रा. तालखेड ता.माजलगाव जि.बीड ह.मु.जयभीम नगर माजलगांव व भारतभूषण कांबळे रा. रोषनपुरी ता.माजलगाव जि.बीड या दोन्ही परीवाराच्या साक्षगंधा मध्ये-खर्चाला फाटा देत मंगल परिणय सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला या मध्ये,दयानंद स्वामी, विजय साळवे,कचरू तात्या खळगे,धम्मानंद साळवे,अशोक पौळ, अमोल डोंगरे,किसन भदर्गे,राजाभाऊ पोटभरे,रूपचंदकांबळे, जयराम कांबळे,तात्या कांबळे,रमेश वाल्मिकी, कैलास वाल्मिकी, जयभीम नगर मधील भिकू कांबळे,नंदु कांबळे,विशाल



टाकणखार,एम.के. प्रधान व इतर मान्यवराच्याउपस्थितीत संपन्न झाला.बोधाचार्य म्हणून शाम वाघमारे यांनी विधी पार पाडला मुक्तिराम ताकट,मा. सरपंच गणेश नामदेव, महादेव ताकट, राजाभाऊ ताकट उपस्थीत होते.वंचित बहुजन आघाडीचे अंकुश जाधव,जयराम कांबळे यांनी या साखर पुड्यात मंगल परिणय लावण्यासाठी दोन्ही कुटुंबास मध्यस्थीची भूमिका घेतली या कार्यक्रमास उषाताई बनसोडे,दिपक टाकणखार,अविनाश बनसोडे,दिपक कसबे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी विकास मस्के यांनी परिश्रम घेतले.

### कसलं स्वातंत्र्य, आमचे मोरही गाव अजूनही रस्त्याविनाच

## कळवट वास्तव : आजही डोक्यावरच ओझे वाहत असल्याची नागरिकांची व्यथा

**मोलगी । रविंद्र वळवी**

नागरिकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे व गावे एकमेकांना जोडण्यासाठी मोठ्या रस्त्यांसह वाडीजोड व अन्य रस्ते बनले, बहुतांश रस्ते वेळोवेळी उखडून नव्यानेही बनवले गेले. मात्र, अतिदुर्गम भागात तथा गुजरात महाराष्ट्राच्या सीमेवरील मोरही (ता.अक्कलकुवा) या महसुली गावात अजूनही कुठलाच रस्ता झाला नाही. त्यामुळे 'कसलं स्वातंत्र्य आमच्या नशिबात केवळ पायपीटच आली' अशी व्यथा तेथील नागरिकांनी व्यक्त केली. वर्षानुवर्षे डोक्यावरच जीवनाचे ओझे वाहणाऱ्या या मोरहीकरांनी आता थेट रस्त्यावर उतरण्याचे मत व्यक्त केले.



वडफळी (ता.अक्कलकुवा) ग्रुप ग्राम पंचायत अंतर्गत मोरही हे गाव विकासाला पारखे ठरत आहे. चौथीपर्यंतची जि.प.शाळा व अंगणवाडी वगळता तेथे स्वातंत्र्याच्या अन्य कुठल्याच खुणा दिसून येत नाही. याबाबत आमच्या गावात अजून रस्ताच पोहोचला नाही, विकासगंगा कोणत्या मार्गाने येईल असा प्रश्न करत यंत्रणेने वर्षानुवर्षे आम्हाला विकासापासून लांब ठेवल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले. शिवाय आमच्या व्यथा समजून घेत रस्ता मंजूर करावा अशी अपेक्षा खेमसिंग वसावे, हुपसिंग वसावे, कांड्या वसावे, भिका तडवी, खुमानसिंग वसावे, सुरेश तडवी, फुरता वसावे, बोंडा वसावे, वनसिंग वसावे, दिनेश वसावे, रमण वसावे, भरत तडवी यांनी व्यक्त केली.

## उपेक्षित लोकांचा उत्कर्ष साधण्याचा विचार राष्ट्र या संकल्पनेत अभिप्रेत असतो-साहित्यिक अनंत धनसर

**मुंबई । प्रतिनिधी**

धर्म आणि जातीपेक्षा देश मोठा असतो. आणि म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, मी प्रथम भारतीय आणि अंततः ही भारतीयच आहे. आपल्या देशात लोकशाहीची संकल्पना विकसित होत असताना विखुरली जाऊ नये या साठी जर प्रयत्न करायचे असतील तर, आपला सर्व भारतीय समाज बंधुत्वाच्या नात्याने सोबत राहिला पाहिजे. हिंदू , मुस्लिम, बौद्ध, शीख, पंजाबी, जाट, ख्रिश्चन, हा सर्व समाज एक आहे. हि संकल्पना टिकली तर राष्ट्र टिकेल. असे प्रतिपादन कवी,साहित्यिक, अनंत धनसरे यांनी केले. गणेश नगर, चेंबूर येथील माता सावित्रीबाई फुले नगर मधील रहिवाशांनी स्थापन केलेल्या माता सावित्रीबाई फुले को.ऑप.सोसायटीच्या वतीने ७९ व्या भारतीय स्वातंत्र्य दिना निमित्त (१५ ऑगस्ट २०२५ ) ध्वजारोहणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. ते पुढे बोलताना म्हणाले



की, आज आपल्या देशात विविध प्रकारची विषमता वाढलेली दिसत असताना सुध्दा ती दूर करण्यासाठी सामाजिक दृष्ट्या कोणतेही प्रयत्न होताना दिसत नाही. विषमता दूर करणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे, असेही अनंत धनसरे म्हणाले. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ पत्रकार सुरेश गायकवाड, संतोष भालेराव,आदी उपस्थित होते.माता सावित्रीबाई फुले को.ऑप. सोसायटीचे अध्यक्ष शरद पवार, उपाध्यक्ष रमेश जाधव सेक्रेटरी मोहन धांडे लेखापाल राजन चरकारी सल्लागार सुरेश गांगुर्डे कार्याध्यक्षा मनीषा लोंढे आदी संस्थेचे सदस्य आणि रहिवासी या वेळी उपस्थित होते.

## अंगणवाडी संघटनेतील अंगणवाडी पर्यवेक्षिका घोलप यांनी हस्तक्षेप थांबवावा-अरुणा आठवले

**बीड । प्रतिनिधी**

श्रीमती जयश्री घोलप गेवराई प्रकल्प १ येथे कार्यरत आहेत परंतु अंगणवाडी पर्यवेक्षिकेची कामे कमी व संघटनेची कामे जास्त प्रमाणात करतात, बीड जिल्हयामधे विविध संघटना कार्यरत आहेत. परंतु गेवराई तालुक्यामध्ये दोन संघटना काम करतात.भगवान देशमुख यांची महाराष्ट्र राज्य कर्मचारी अंगणवाडी कर्मचारी महासंघ बीड व अरुणाताई आठवले यांची महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघटना बीड या दोन संघटना आहेत. या दोन संघटना मध्ये अंगणवाडी कार्यकर्ती/मदतनीस तालुक्यामध्ये विभागून आहेत. .

परंतु ज्या महिला आमच्या संघटनेमध्ये काम करतात आशा महिलांना घोलप सांगतात कि आरुणा आठवले यांच्या संघटनेमध्ये कोणी रहायचे नाही. जेवढे सर्कल आहेत त्यांनी भगवान देशमुख, कमल बांगर यांच्याच संघटनामध्ये काम करावे नाहीतर मी रोज दौरे करून नोटीस देवून नोकरीवरून काढेल तसेच बा.वि.प्र.अधिकारी आमच्या कागदाला व आम्हाला महत्व देतात त्यामुळे त्या संघटनेतून बाहेर पडून भगवान देशमुख यांच्या संघटनेत या अश्या धमक्या देतात. मादळमोही व सिरसमार्ग सर्कलमध्ये मी आठवलेच्या संघटनेमधुन भगवान् देशमुख यांच्या संघटनेमधुन पाठवले आहेत. अश्या प्रकारे धमक्या व महिलाचे मानसिक खच्चीकरण करत आहे. ज्या आठवले यांच्या संघटनेत आहेत त्यांना दौरे करूण धमक्या देणे,मदतनिस ला हाताशी धरुण कार्यकर्तीला त्रास देणे, कार्यकर्त्या कडून टी.ए.डि.ए. जळतानातून २०% टक्यांनी पैसे देणे ज्यांनी विरोध केला तिला कमी करणे, एकच गावातील कार्यकर्ती मध्ये टी.ए. डी.ए. तफावत आणणे आमच्या संघटनेतील कार्यकर्तीचे २००० असेल तर त्यांच्या संघटनेतिल कार्यकर्तीचे २५००-३००० असे काढतात, आणि ही तफावत पाहण्यासाठी गेवराईच्या टी.ए.डी.ए ची यादी मागून घेऊन तपासणी करू शकता. दुसरा मुद्दा म्हणजे सामूहिक कार्यक्रम जर लागलेच तर माझा सत्कार करा, वर्गणी जमा करून साडी आणा, मग वर्गणी जमा करून साडी घेण्यात येते याचा पुरावा म्हणून फोटो सोबत जोडले आहेत. तसेच आमच्या संघटनेतील कार्यकर्तीला खालच्या दर्जाची वागणूक देण्यात येऊन त्यांच्या संघटनेच्या कार्यकर्त्यांना खुर्च्या वर बसवने आणि आमच्या कडे असलेल्या कार्यकर्तीला खाली बसवणे असे मानसिक खच्चीकरण करून त्यांच्याच अध्यक्षांचा सत्कार केला जातो. तुम्ही त्या संघटनेत गेला नाहीत तर त्रास देऊ मी बांगर ताई व देशमुख सरांच्या पाया पडायला भाग पाडेन अशी धमकी दिली जाते. तरी माननीय साहेबांनी पर्यवेक्षिकेचा संघटनेतील हस्तक्षेप थांबवून योग्य ती कारवाई करावी अशा मागणीचे निवेदन अरुणा आठवले महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी महासंघ जिल्हाध्यक्ष बीड यांनी दिले आहे.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077